# १२ ऑगस्ट २०२० रोजी ठाणे महाविद्यालयातील पाणीनी सभागृहामध्ये दुपारी एक ते तीन या वेळात राष्ट्रार्पणमस्तु या कार्यक्रमाचे आयोजन

ठाणे महानगरपालिका पुरस्कृत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त
उत्सव ठाणे ७५ अंतर्गत

विद्या प्रसारक मंडळ व प्राच्य विद्या अभ्यास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १२ ऑगस्ट २०२० रोजी ठाणे महाविद्यालयातील पाणीनी सभागृहामध्ये दुपारी एक ते तीन या वेळात राष्ट्रार्पणमस्तु या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

तुडुंब भरलेल्या प्रेक्षागृहाच्या साक्षीने विद्या प्रसारक मंडळातील इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी संत परंपरेपासून सुरू झालेल्या क्रांतीयज्ञाचा नेटका नाट्यविष्कार रसिकां समोर सादर केला.

नाट्य, नृत्य, संगीत ,चित्रफिती अशा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रकटीकरण प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून गेले.

सौ. सुमेधा बेडेकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या नाटिकेचे लेखन श्री. मिलिंद पाध्ये यांनी केले. दिग्दर्शन श्री. प्रवीण जोशी व साधना जोशी यांनी केले. संगीत श्री. महेश कांबळे तसेच तांत्रिक बाजू कु. ऋचा जोशी हिने सांभाळली.

या नाटिकेचे वैशिष्ट्य म्हणजे अथ पासून इति पर्यंत यात सहभागी सर्व कलाकार हे विद्या प्रसारक मंडळाचेच होते.

अगदी वेळेवर सुरू होऊन वेळेत संपलेल्या या नेटक्या व देखण्या अशा कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त व कार्याध्यक्ष डॉक्टर श्री विजय बेडेकर,सौ. सुमेधा बेडेकर, डॉक्टर श्री. महेश बेडेकर तसेच महाविद्यालयातील सर्व प्रमुख विभाग व प्राचार्य उपस्थित होते


12th August, 2022
zoom
Joshi Bedekar College VC


zoom
Joshi Bedekar College VC


zoom
Joshi Bedekar College VC


zoom
Joshi Bedekar College VC


zoom
Joshi Bedekar College VC